07 MAR 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# किफायतशीर कार्बनशोषक तंत्रज्ञान विकासाची गरज

## मेजर जनरल डॉ. श्री पाल; 'सृष्टी संजीवन' राष्ट्रीय पर्यावरण परिषदेस प्रारंभ




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सृष्टी संजीवन राष्ट्रीय पर्यावरण परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना मेजर जनरल डॉ. श्री पाल. मंचावर मान्यवर.**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पर्यावरणातील कार्बनचे उत्सर्जन रोखणे ही आजची महत्त्वाची गरज आहेच, पण त्याचबरोबर वातावरणातील कार्बन थेट शोषून घेणारे किफायतशीर तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेने संशोधनाची दिशा केंद्रित करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विशिष्ट सेवा पदक पुरस्कृत मेजर जनरल डॉ. श्री पाल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग, पर्यावरणशास्त्र अधिविभाग, हवामान बदल व शाश्वतता अभ्यास केंद्र, भूगोल अधिविभाग आणि इंडियन सोसायटी ऑफ हौसिंग रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स (इशरे) संस्थेचा कोल्हापूर चाप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सृष्टी संजीवन' या राष्ट्रीय पर्यावरण परिषदेच्या उद्घाटन समारंभात बीजभाषण करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. इशरे-कोल्हापूरचे प्रेसिडेंट प्रमोद पुंगावकर प्रमुख उपस्थित होते.

मेजर जनरल डॉ. श्री. पाल म्हणाले, जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी कार्बनचे प्रमाण कमी करणे आणि संतुलित राखणे अत्यावश्यक आहे. हे प्रदूषण रोखणे आवाक्यापलीकडचे वाटत असले तरी मानवासह जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी ते आपल्याला करावे लागेल.

यावेळी डॉ. पाल यांनी अत्याधुनिक बंकर तंत्रज्ञान विकास आणि उभारणी याकामी बजावलेल्या कामगिरीविषयी माहिती दिली. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर यांनी स्वागत केले. डॉ. पुनश्री फडणीस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी. ए. प्रभू यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

### १३० शोधनिबंध सादर

राष्ट्रीय परिषदेसाठी देशभरातील संशोधकांकडून पर्यावरणविषयक १३० शोधनिबंध प्राप्त झाले आहेत. त्यांचे पुढील दोन दिवसांत विविध सत्रांतून सादरीकरण होईल.

07 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# किफायतशीर कार्बनशोषक तंत्रज्ञान विकासाची गरज

## मेजर जनरल डॉ. पाल : विद्यापीठात 'सृष्टी संजीवन' राष्ट्रीय पर्यावरण परिषदेला प्रारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : पर्यावरणातील कार्बनचे उत्सर्जन रोखणे ही आजची महत्त्वाची गरज आहे. पण, वातावरणातील कार्बन थेट शोषून घेणारे किफायतशीर तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेने संशोधनाची दिशा केंद्रित करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विशिष्ट सेवा पदक पुरस्कृत मेजर जनरल डॉ. श्री. पाल यांनी केले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय पर्यावरण परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलताना मेजर जनरल डॉ. श्री पाल. यावेळी डावीकडून सतीश काळे, पुनश्री फडणीस, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रमोद पुंगावकर, ए. बी. कोळेकर उपस्थित होते.

### महाराष्ट्र भारतीय अणुतंत्रज्ञानाची जनकभूमी

■ मानव जातीच्याच नव्हे, तर एकूणच पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी कार्बनचे प्रमाण कमी करणे आणि संतुलित राखणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र ही भारतीय अणुतंत्रज्ञानाची जनकभूमी असल्याचे मेजर जनरल डॉ. पाल यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान, पर्यावरणशास्त्र, भूगोल अधिविभाग, हवामान बदल व शाश्वतता अध्यास केंद्र, इंडियन सोसायटी ऑफ हौसिंग रेफ्रिजरेटिंग अँन्ड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स (इशरे) कोल्हापूरतर्फे आयोजित 'सृष्टी संजीवन' या राष्ट्रीय पर्यावरण परिषदेला आज प्रारंभ झाला. उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बीजभाषण करताना डॉ. पाल बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर इशरे-कोल्हापूरचे अध्यक्ष प्रमोद पुंगावकर प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "समाजाला घातक पर्यावरणीय दुष्परिणामांपासून वाचविण्यासाठी इशरेने घेतलेला पुढाकार महत्त्वाचा आहे. उद्योग आणि औद्योगिक संस्थांनी अशा सहकार्यासाठी पुढे येणे हे सकारात्मक लक्षण आहे."

तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर यांनी स्वागत केले. डॉ. गिरीश कुलकर्णी, प्रकाश राऊत, सचिन पन्हाळकर, एस. बी. सादळे, अतुल इंगवले, महेश साळुंखे, श्रीकांत भोसले, एस. बी. चव्हाण उपस्थित होते. समन्वयक डॉ. पुनश्री फडणीस यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी. ए. प्रभु यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सहसमन्वयक सतीश काळे यांनी आभार मानले.

07 MAR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पृथ्वीवर २२०० सालापर्यंत जीवसृष्टी राहाणार नाही

■ मेजर जनरल डॉ. श्री पाल यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : कार्यशाळेत मेजर जनरल श्री पाल यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. अजित कोळेकर, डॉ. गिरीश कुलकर्णी, इशरीचे प्रमोद पुंगावकर, पुनश्री फडणीस, डॉ. सतीश काळे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

औद्योगिक क्षेत्र, आणि वाढत्या वाहनांमुळे हवेत कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण खूप वाढत आहे. तसेच मोठमोठाली झाडे तोडून अनेक मजली बांधकाम उभारली जात आहेत. परिणामी पर्यावरण प्रदुषणात वाढ झाली आहे. कार्बन उत्सर्जनामुळे २२०० सालापर्यंत पृथ्वीतलावर जीवसृष्टी राहणार नाही, असे प्रतिपादन मेजर जनरल डॉ. श्री पाल यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि इंडियन सोसायटी ऑफ हीटींग, रेफिरजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनियर्स (इशरे कोल्हापूर चाप्टर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय पर्यावरण परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सृष्टी संजीवन हा या परिषदेचा विषय होता. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुरुगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते.

मेजर पाल म्हणाले, एकीकडे वाहनांची संख्या वाढली तर दुसरीकडे जंगले, झाडांची कतल करून इमारतींचे बांधकाम होवू लागले आहे. त्यामुळे पर्यावरण प्रदुषणात वाढ होत आहे.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, इसरेसह अन्य पर्यावरण संघटनांना बरोबर घेवून शिवाजी विद्यापीठ कायम पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न करते. पर्यावरण संवर्धनात शिवाजी विद्यापीठ अग्रेसर असून अशा विविध परिषदा, कार्यशाळांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासंदर्भात जनजागृती केली जाते. पर्यावरण विभाग, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी विभाग, भुगोल विभागासह अन्य विभागात पर्यावरण संवर्धनासंदर्भात वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. त्यामुळे विद्यापीठात जैवविविधता पाहायला मिळते.

प्रास्ताविक अजित कोळेकर यांनी केले. आभार सतीश काळे यांनी मानले. पाहुण्यांची ओळख पी. ए. प्रभू यांनी करून दिली. यावेळी डॉ. चव्हाण, महेश साळुंखे, श्रीकांत भोसले, पी. ए. प्रभू डॉ. पाटील, इशरे कोल्हापूर चाप्टरचे अध्यक्ष प्रमोद पुंगावकर, इशरे कोल्हापूर चाप्टरचे डॉ. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या वाटचालीत महिलांचे योगदान महत्त्वाचे : कुलगुरू डॉ. शिंदे

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कार्यशाळा उत्साहात



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. निशा मुडे-पवार व मान्यवर.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीत महिला शिक्षकांसह प्रशासकीय सेविकांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. विद्यापीठामधील महिला उच्च नीतिमूल्यांनिशी कार्यरत असून, सर्व घटकांना न्याय प्रदान करण्यातही त्या आघाडीवर आहेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समिती, महिला वसतिगृह, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, भारतामध्ये स्त्रियांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रत्येक व्यक्तीला समतेची, एकतेची वागणूक देण्याचे धोरण होते, तेच धोरण स्वीकारून महात्मा जोतिराव फुले यांनी महिलांच्या शिक्षणामध्ये मोठे योगदान दिले.

आंतरविद्याशाखीय विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. भारती पाटील यांनीही मार्गदर्शन केले. स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. प्राजक्ता शहा यांनी सूत्रसंचलन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, महिला वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षिका डॉ. माधुरी वाळवेकर, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, डॉ. ज्योती जाधव, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. विनीता रानडे, संध्या अडसुळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2025
लोकमत

# 'विद्यापीठाच्या वाटचालीत महिलांचे योगदान महत्त्वाचे'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाटचालीत महिला शिक्षकांसह प्रशासकीय सेविकांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी केले.

राजर्षी शाहू सभागृहामध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्त्री अभ्यास केंद्र, बेटी बचाओ अभियान, शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, विद्यापीठ अंतर्गत तक्रार समिती, महिला वसतिगृह, विद्यार्थी विकास विभाग यांच्यावतीने 'महिलांचे उच्च शिक्षणातील शैक्षणिक आणि प्रशासकीय योगदान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. त्यावेळी ते बोलत होते. आंतरविद्याशाखीय विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. डॉ. निशा मुडे-पवार यांनी स्वागत, प्राजक्ता शहा यांनी सूत्रसंचालन, डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2025

पुढारी

# कस्तुरबा गांधी यांनी आपले स्वत्त्व टिकवले : नवांगूळ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महात्मा गांधी यांच्या बरोबरीने जीवन व्यतीत करताना स्वतःची फरफट न होऊ देता कस्तुरबा गांधी यांनी स्वत्त्व टिकविले, असे प्रतिपादन लेखिका सोनाली नवांगूळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

नवांगूळ म्हणाल्या, कस्तुरबा या महात्मा गांधी यांच्या अनुयायी नव्हत्या, तर सखी होत्या. त्यामुळे त्यांच्या जीवनातील आपले स्थान अधोरेखित कसे करावयाचे, हे त्यांना माहीत होते. महात्मा गांधी यांच्या चळवळी यांच्याशी जुळवून घेताना दमछाक होत असली, तरी त्यांनी हे बदल स्वीकारले.

डॉ. नंदा पारेकर यांनी गृहिणी ते गांधींच्या सत्याग्रहात सहभागी होणाऱ्या पहिल्या महिला सत्याग्रही, ही कस्तुरबांची वाटचाल मोलाचे होती, असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. भारती पाटील यांनी केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले. ,

कार्यक्रमास डॉ. सुरेश शिपूरकर, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. जयश्री कांबळे यांच्यासह शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2025
सकाळ

# लोकनेते देसाई अध्यासनातर्फे सोमवारी परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (ता. १०) सकाळी अकरा वाजता परिसंवाद होणार आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनातर्फे आयोजित या परिसंवादात ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर (विषय-महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचा आढावा १९६०-१९८०), डॉ. अरुण भोसले (महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्व), ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार (महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचे अंतरंग), डॉ. विजय चोरमारे (लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे राजकीय नेतृत्व) प्रमुख वक्ते आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. अवनीश पाटील यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2025
सकाळ

# विद्यापीठात हम्बोल्ट फेलोशिपबाबत आज परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी, इंटरनॅशनल अफेअर्स सेल आणि हम्बोल्ट ॲकॅडमी (पुणे चॅप्टर) व महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्स यांच्यातर्फे पी. एम.-उषा योजनेच्या माध्यमातून आज, शुक्रवारी 'अलेक्झांडर वॉन हम्बोल्ट पोस्टडॉक्टरल फेलोशिप'बाबत मार्गदर्शन करण्यासाठी परिसंवाद होणार आहे. विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात सकाळी अकरा ते सायंकाळी साडेपाच या वेळेत परिसंवाद होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2025
लोकमत

# 'हम्बोल्ट'वर आज विशेष परिसंवाद

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचे स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी, इंटरनॅशनल अफेअर्स सेल आणि हम्बोल्ट अकॅडमी (पुणे चॅप्टर) व महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्स यांच्या वतीने आज, शुक्रवारी 'अलेक्झांडर वॉन हम्बोल्ट पोस्ट डॉक्टरल फेलोशिप' या प्रतिष्ठित फेलोशिपच्या अनुषंगाने परिसंवाद आयोजित केला आहे. भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात सकाळी अकरा ते सायंकाळी साडेपाच या वेळेत हा परिसंवाद होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 MAR 2025

पुढारी

# बी.एस्सी. बी.एड. एकात्मिक अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेसाठी १६ पर्यंत मुदत

**कोल्हापूर :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० नुसार शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात बी. एस्सी. बी. एड. (इंटिग्रेटेड टीचर एज्युकेशन प्रोग्राम) या चार वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमाच्या राष्ट्रीय सामायिक प्रवेश परीक्षेसाठी अर्ज भरण्यास १६ मार्चपर्यंत मुदत आहे. या चार वर्षांच्या एकात्मिक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. बारावी विज्ञान शाखा उत्तीर्ण किंवा ज्यांनी बारावी विज्ञान शाखेची परीक्षा नुकतीच दिलेली आहे, असे विद्यार्थी राष्ट्रीय परीक्षा एजन्सी यांच्याद्वारे घेण्यात येणाऱ्या नॅशनल कॉमन एन्ट्रस टेस्ट देण्यासाठी पात्र असून ते सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात.

0 7 MAR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रिकेटमध्ये रसायनशास्त्र, बास्केटबॉलमध्ये क्रीडा अधिविभाग विजयी

## ॲथलेटिक्सचा पदक प्रदान सोहळा उत्साहात

शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात गुरुवारी चौथ्या दिवशी पुरुषांच्या क्रिकेटमध्ये अंतिम सामन्यात रसायनशास्त्र अधिविभागाने एम.बी.ए. विभागावर विजय मिळविला. बास्केटबॉल पुरुष स्पर्धेच्या अंतिम सामन्यात क्रीडा अधिविभागाने अर्थशास्त्र अधिविभागावर विजय संपादन केला.

शिवस्पंदन स्पर्धेत चौथ्या दिवशी, पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेमध्ये यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटने तृतीय क्रमांक पटकावला. महिला क्रिकेट स्पर्धेमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग आणि गणित अधिविभाग यांच्यात अंतिम सामना शुक्रवारी रंगणार आहे.



**कोल्हापूर : शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात विविध क्रीडा प्रकारांत विजेत्या महिला ॲथलेटिक.** **(छाया : नाज ट्रेनर)**

रस्सीखेच (महिला) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान विभाग, गणित विभाग, वाय. सी. एस. आर. डी., नॅनो सायन्स विभाग यांनी पुढील फेरीत प्रवेश केला. पुरुष स्पर्धेत एमबीए, वाय.सी.एस.आर.डी., क्रीडा अधिविभाग यांनी पुढील फेरीत प्रवेश केला. व्हॉलीबॉल (पुरुष) स्पर्धेत अनुक्रमे तंत्रज्ञान अधिविभाग, ग्रंथालय व माहितीशास्त्र आणि ए.जी.पी.एम. यांनी क्रमांक मिळविले.

कबड्डी (पुरुष) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, वायसीएसआरडी आणि एजीपीएम यांनी अनुक्रमे तीन क्रमांक मिळविले. कबड्डी (महिला) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग आणि गणित अधिविभाग यांनी अनुक्रमे क्रमांक मिळविले. बास्केटबॉल (पुरुष) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, अर्थशास्त्र अधिविभाग आणि तंत्रज्ञान अधिविभाग यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक प्राप्त केले.

**ॲथलेटिक्स : पुरुष, महिला स्पर्धेचा निकाल**

**१०० मी. महिला-** सानिया चौगुले (क्रीडा अधिविभाग), आदिती गुरव (भौतिकशास्त्र), ऋचा पाटील (तंत्रज्ञान अधिविभाग), **२०० मी. महिला-** मनीषा पाटील (क्रीडा अधिविभाग), प्रेरणा गोडके (तंत्रज्ञान विभाग), सानिया मोमीन (क्रीडा अधिविभाग). **गोळा फेक (पुरुष)-** जयवर्धन पाटील (क्रीडा अधिविभाग), ऋषिकेश पाटील (भूगोल), योगेश देशमुख (एमबीए). **लांब उडी (पुरुष)-** आर्यन शेजाळ (क्रीडा अधिविभाग), साहिल शिकलगार (रसायनशास्त्र), शुभम कांबळे (क्रीडा अधिविभाग).

**४०० मी. (पुरुष)-** प्रेम संकपाळ (तंत्रज्ञान), पार्थ कांबळे (क्रीडा), रोहित बिराजदार (जैवतंत्रज्ञान).

ॲथलेटिक्समधील सर्व विजेत्यांना सायंकाळी वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजाराम गुरव यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत पदक प्रदान समारंभ झाला. शुक्रवारी (दि. ७) क्रिकेट (महिला) बास्केटबॉल (महिला) रस्सीखेच (पुरुष) सामने होणार आहेत.

07 MAR 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात ॲथलेटिक्समधील महिला विजेत्यांना वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या हस्ते पदके देण्यात आली. दुसऱ्या छायाचित्रात पुरुष संघ.

# रसायनशास्त्र, क्रीडा अधिविभागाचे वर्चस्व

## तंत्रज्ञान, गणित अधिविभागात रंगणार आज क्रिकेटचा अंतिम सामना

**सकाळ वृत्तसेवा**

### शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात चौथ्या दिवशी पुरुषांच्या क्रिकेटमध्ये अंतिम सामन्यात रसायनशास्त्र अधिविभागाने एम.बी.ए. विभागावर विजय मिळविला. बास्केटबॉल पुरुष स्पर्धेच्या अंतिम सामन्यात क्रीडा अधिविभागाने अर्थशास्त्र अधिविभागाला पराभूत केले. वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत ॲथलेटिक्समधील विविध प्रकारांतील विजेत्या क्रीडापटूंना पदक प्रदान करण्यात आले. पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेत यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटने तृतीय क्रमांक पटकावला.

महिला क्रिकेट स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभाग आणि गणित अधिविभाग यांच्यात अंतिम सामना उद्या (शुक्रवार) रंगणार आहे. महिलांच्या रस्सीखेच स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान विभाग, गणित विभाग, वाय. सी. एस. आर. डी., नॅनो सायन्स विभाग, तर पुरुषांत एमबीए, वाय. सी. एस. आर. डी., क्रीडा अधिविभाग यांनी पुढील फेरीत प्रवेश केला. पुरुषांच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, ग्रंथालय व माहितीशास्त्र द्वितीय आणि ए.जी.पी.एम.ने तृतीय क्रमांक मिळविला. पुरुषांच्या कबड्डी स्पर्धेत क्रीडा अधिविभागाने प्रथम, वायसीएसआरडीने द्वितीय, एजीपीएमने तृतीय क्रमांक पटकावला. महिलांच्या कबड्डी स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान अधिविभाग आणि गणित अधिविभाग यांनी अनुक्रमे क्रमांक मिळविले. पुरुषांच्या बास्केटबॉल स्पर्धेत क्रीडा अधिविभाग प्रथम, अर्थशास्त्र अधिविभाग द्वितीय, तंत्रज्ञान अधिविभाग तृतीय क्रमांक विजेता ठरला.

### ॲथलेटिक्स स्पर्धेचा निकाल

■ महिला : १०० मीटर : सानिया चौगुले (क्रीडा अधिविभाग), आदिती गुरव (भौतिकशास्त्र), ऋचा पाटील (तंत्रज्ञान अधिविभाग). २०० मीटर : मनीषा पाटील (क्रीडा अधिविभाग), प्रेरणा गोडके (तंत्रज्ञान विभाग), सानिया मोमीन (क्रीडा अधिविभाग). गोळा फेक : पुरुष : जयवर्धन पाटील (क्रीडा अधिविभाग), ऋषिकेश पाटील (भूगोल), योगेश देशमुख (एमबीए). लांब उडी : पुरुष : आर्यन शेजाळ (क्रीडा अधिविभाग), साहिल शिकलगार (रसायनशास्त्र), शुभम कांबळे (क्रीडा अधिविभाग). ४०० मीटर : प्रेम संकपाळ (तंत्रज्ञान), पार्थ कांबळे (क्रीडा), रोहित बिराजदार (जैवतंत्रज्ञान).

0 7 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# क्रिकेटमध्ये रसायनशास्त्र; बास्केटबॉलमध्ये क्रीडा विजयी

## शिवस्पंदन क्रीडा महोत्सव: ॲथलेटिक्सचे बक्षीस वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात चौथ्या दिवशी गुरुवारी पुरुषांच्या क्रिकेटमध्ये अंतिम सामन्यात रसायनशास्त्र अधिविभागाने एम.बी.ए. विभागावर विजय मिळविला. बास्केटबॉल पुरुष स्पर्धेच्या अंतिम सामन्यात क्रीडा अधिविभागाने अर्थशास्त्र अधिविभागावर विजय मिळविला. सायंकाळी वनस्पतीशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजाराम गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत ॲथलेटिक्समधील विविध प्रकारांतील विजेत्या क्रीडापटूंना पदक प्रदान करण्यात आले.

**महिला क्रिकेट स्पर्धेमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग आणि गणित अधिविभाग यांच्यात अंतिम सामना आज रंगणार**



शिवस्पंदन क्रीडामहोत्सवातील ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारांचा पदक प्रदान सोहळा डॉ. राजाराम गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

शिवस्पंदन स्पर्धेत चौथ्या दिवशी, पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेमध्ये यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटने तृतीय क्रमांक पटकावला. .

रस्सीखेच (महिला) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, तंत्रज्ञान विभाग, गणित विभाग, वाय.सी.एस.आर.डी., नॅनो सायन्स विभाग यांनी पुढील फेरीत प्रवेश केला. पुरुष स्पर्धेत एमबीए, वाय.सी.एस.आर.डी., क्रीडा अधिविभाग यांनी पुढील फेरीत प्रवेश केला.

व्हॉलीबॉल (पुरुष) स्पर्धेत अनुक्रमे तंत्रज्ञान अधिविभाग, ग्रंथालय व माहितीशास्त्र आणि ए.जी.पी.एम. यांनी क्रमांक मिळविले. कबड्डी (पुरुष) स्पर्धेत क्रीडा अधिविभाग, वायसीएसआरडी, आणि एजीपीएम यांनी अनुक्रमे तीन क्रमांक मिळविले. कबड्डी (महिला) स्पर्धेत क्रीडा, तंत्रज्ञान आणि गणित अधिविभाग यांनी क्रमांक मिळविले.

## ॲथलेटिक्स पुरुष व महिला स्पर्धेचा निकाल :

**१** १०० मी. महिला-सानिया चौगुले (क्रीडा अधिविभाग), आदिती गुरव (भौतिकशास्त्र), ऋचा पाटील (तंत्रज्ञान अधिविभाग), २०० मी. महिला- मनीषा पाटील (क्रीडा अधिविभाग), प्रेरणा गोडके (तंत्रज्ञान विभाग), सानिया मोमीन (क्रीडा अधिविभाग)

गोळाफेक (पुरुष)- जयवर्धन पाटील (क्रीडा अधिविभाग), ऋषिकेश पाटील (भूगोल), योगेश देशमुख (एमबीए)

**२** लांब उडी (पुरुष)- आर्यन शेजाळ (क्रीडा अधिविभाग), साहिल शिकलगार (रसायनशास्त्र), शुभम कांबळे (क्रीडा अधिविभाग)

४०० मी. (पुरुष)- प्रेम संकपाळ (तंत्रज्ञान), पार्थ कांबळे (क्रीडा), रोहित बिराजदार (जैवतंत्रज्ञान).